# राज्यसेवा मुख्य परीक्षा

## घटकनिहाय

## प्रश्नपत्रिका विश्लेषण

## २०१२–२०१८

# GS : पेपर : 4

PRITHVI®
Publication

**राज्यसेवा मुख्य परीक्षा**

**घटकनिहाय प्रश्नपत्रिका विश्लेषण**

**२०१२-२०१८**

**GS : पेपर : ४**

**© पृथ्वी पब्लिकेशन**

**आवृत्ती**

एप्रिल २०१९

**प्रकाशक**

'पृथ्वी पब्लिकेशन', १५३६

सदाशिव पेठ, पुणे- ४११०३०.

फोन : ०२० - २४४५१९८६

**मुखपृष्ठ मांडणी**

नंदकिशोर धपाटे

**मांडणी**

रूपाली तांबे

अपूर्वा शिंदे

कोमल शेडगे

**मुद्रितशोधन**

प्रज्ञा सुधाकर भोसले

**वितरण व्यवस्था**

मो. नं. : ८३९०५५४१६१

**अभिप्राय, सूचना व मागणीसाठी संपर्क**

मो. नं. : ८३९०५५४१६१

publication@prithvi.net.in

**मूल्य : ₹ २९०/-**

या पुस्तकातील मजकुराचे कायदेशीर हक्क कॉपीराईट कायद्यानुसार प्रकाशकाकडे आहेत. या मजकुराचे कोणत्याही स्वरूपात पुनर्मुद्रण करण्यासाठी प्रकाशकाची परवानगी आवश्यक आहे. सदर बाबीचे उल्लंघन झाल्यास कॉपीराईट कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

---

या पुस्तकातील मजकूर व माहिती विविध स्त्रोतांमधून घेण्यात आली आहे. हा मजकूर व माहिती जास्तीत जास्त अचूक ठेवण्याचा प्रयत्न प्रकाशकाने केला आहे. तरीदेखील त्यामध्ये कालसापेक्ष व स्थलसापेक्ष बदल होऊ शकतात. या पुस्तकातील मजकूर व माहिती यामुळे होणाऱ्या नुकसानीस प्रकाशक जबाबदार राहणार नाहीत.

# अनुक्रमणिका


| १. अर्थव्यवस्था व नियोजन | |
|---|---|
| १.१ **भारतातील मानव संसाधन विकास** : भारतातील लोकसंख्येची सद्य:स्थिती - संख्यात्मक स्वरूप (आकारमान १.१ भारतीय अर्थव्यवस्था : भारतीय अर्थव्यवस्थेमधील आव्हाने : गरिबी, बेरोजगारी व प्रादेशिक असमतोल, नियोजन : प्रक्रिया प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनांचा आढावा, मूल्यमापन, विकासाचे सामाजिक व आर्थिक निदर्शक, राज्य व स्थानिक स्तरावरील नियोजन, विकेंद्रीकरण - संविधानातील ७३ वी व ७४ वी सुधारणा. | १० |
| १.२ **नागरी व ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास** : गरजा व महत्त्व, ऊर्जा, पाणीपुरवठा व स्वच्छता, गृहनिर्माण, परिवहन (रस्ते, बंदरे इ.) संसूचना (टपाल व तारायंत्र, दूरसंचार ), रेडिओचे नेटवर्क, दूरचित्रवाणी, इंटरनेट महाजाल अशा सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांची वाढ व विकास. भारतातील पायाभूत सुविधांशी संबंधित पेचप्रसंग व समस्या, धोरण, पर्याय सरकारी- खासगी क्षेत्रातील भागीदारी (पीपीपी), भारतीय वित्त विकास व पायाभूत सुविधांचा विकास - पायाभूत सुविधांच्या विकासाचे खासगीकरण, पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केंद्र सरकारची व राज्य शासनाची धोरणे, परिवहन व गृहनिर्माण (नागरी व ग्रामीण) समस्या - केंद्र सरकारचे व राज्य शासनाचे उपक्रम व कार्यक्रम, बीओएलटी (बांधा, वापरा, भाडेपट्ट्याने द्या, हस्तांतरित करा) व बीओएलटी (बांधा, वापरा व हस्तांतरित करा) योजना. | २१ |
| १.३ **उद्योग -गरजा** : आर्थिक व सामाजिक विकासात उद्योगाचे महत्त्व व भूमिका वाढीचा आकृतिबंध, विशेषतः महाराष्ट्राच्या संदर्भात भारतातील मोठ्या उद्योगांची संरचना, लघु उद्योग, कुटीर व ग्रामोद्योग, त्यांच्या समस्या व दृष्टीकोन शिथिलीकरण, खासगीकरण व जागतिकीकरण यांचे लघु उद्योगांवरील परिणाम, लघु उद्योगांचा विकास, प्रचालन व संनियंत्रण याकरिता महाराष्ट्राचे धोरण, उपाययोजना व कार्यक्रम. लघु उद्योग व कुटीर उद्योग यांची निर्माण संभाव्यता, विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड), एसजीवीएस. | ४० |
| १.४ **सहकार** : सहकाराची संकल्पना, अर्थ, समुदिष्ट, जुनी व नवीन तत्त्वे, भारतातील सहकार चळवळीची वाढ व विविधीकरण, महाराष्ट्रातील सहकारी संस्था, प्रकार, भूमिका, महत्त्व व विविधीकरण, राज्यधोरण व सहकार क्षेत्र - विधानमंडळ, पर्यवेक्षण, लेखापरीक्षण व साहाय्य, महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या समस्या-जागतिक स्पर्धेच्या युगात सहकारी संस्थांचे भवितव्य, महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा आढावा, सुधारणा व भवितव्य-कृषी पणन यातील पर्यायी धोरणविषयक व उपक्रमशीलता - रोजगार हमी योजना. | ६३ |
| १.५ **आर्थिक सुधारणा** : पार्श्वभूमी, शिथिलीकरण, खासगीकरण व जागतिकीकरण. (संकल्पना, अर्थ, व्याप्ती व मर्यादा), केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणा, जागतिक व्यापार संघटनेची मुदत, तरतुदी व त्यांची अंमलबजावणी आणि भारतीय अर्थव्यवस्थेवरील त्याचा परिणाम व समस्या | ७४ |

| | | |
|---|---|---|
| १.६ | **आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय भांडवली चळवळ :** जागतिकीकरणाच्या युगात उदयास आलेला कल, भारतीय जागतिक व्यापाराची वाढ, रचना व निदेश. भारताचे विदेश व्यापार धोरण – निर्मितीचे प्रचालन, जागतिक व्यापार संघटना व आंतरराष्ट्रीय व्यापार – विदेशी भांडवल, अंतर्देशी प्रवाह – रचना व वाढ एफडीआय (भारतीय वित्त विकास) ई– वाणिज्य, बहुराष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय वित्तव्यवस्था, अभिकरणांची भूमिका (आंतरराष्ट्रीय नाणे निधी) जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय विकास अभिकरण, आंतरराष्ट्रीय पत आकारणी. | ८९ |
| १.७ | **गरिबीचे निर्देशांकन व अंदाज :** दारिद्र्यरेषा–संकल्पना व वस्तुस्थिती, दारिद्र्यरेषेखालील, दारिद्र्य निर्मूलनाच्या उपाययोजना–भारतातील जननक्षमता, विवाहदर, मृत्युसंख्या व रोगटपणा–लिंग सक्षमीकरण धोरण. | १०९ |
| १.८ | **रोजगार निर्धारणाचे घटक :** बेरोजगारीसंबंधात उपाययोजना – उत्पन्न, दारिद्र्य व रोजगार यांच्यामधील संबंध – वितरणासंबंधात प्रश्न व सामाजिक न्याय. | १२० |
| १.९ | **महाराष्ट्राची अर्थव्यवस्था:** कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रांची ठळक वैशिष्ट्ये – महाराष्ट्रातील दुष्काळ व्यवस्थापन – महाराष्ट्रातील एफडीआय. | १३२ |
| | **२. विकास व कृषी अर्थशास्त्र** | |
| २.१ | **समष्टी अर्थशास्त्र :** राष्ट्रीय उत्पन्न लेखांकनाच्या पद्धती– पैशांची कार्य – आधार पैसा – जननक्षम पैसा – पैशाचा संख्या सिद्धांत – पैसा गुणक, चलनवाढीचे पैसाविषयक व पैसाव्यतिरिक्त सिद्धांत – चलनवाढ नियंत्रणः चलनविषयक, आर्थिक आणि थेट उपाययोजना | १४१ |
| २.२ | **सार्वजनिक वित्त व्यवस्था आणि वित्तीय संस्था :** पणन अर्थव्यस्थेमध्ये सार्वजनिक वित्तव्यवस्थेची भूमिका – सरकारी गुंतवणुकीचे निकष गुण वस्तू व सार्वजनिक वस्तू – महसुलीचे स्त्रोत व खर्च (केंद्र व राज्य) – कराचे स्वरूप आणि अर्थसाहाय्य आणि त्यांचा भार व परिणाम – केंद्राचे व भारतातील राज्यांचे कर, करेतर व सरकारी ऋण, सरकारी खर्च (केंद्र व राज्ये) वाढ व त्याची कारणे – सरकारी खर्च सुधारणा – कामगिरी आधारित अर्थसंकल्प – शून्याधारित अर्थसंकल्प – अर्थसंकल्पीय तुटीचे प्रकार – देशांतर्गत आणि देशाबाहेरील कर्ज, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील कर सुधारणांचे पुनर्विलोकन – मूल्यवर्धित कर. सरकारी ऋण– वाढ, रचना व भार, केंद्राला असणारी राज्याची कर्जाची समस्या, राज्यकोषीय तूट – तुटींची संकल्पना आणि नियंत्रण – केंद्र, राज्य आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचा पुढाकार, भारतातील राजकोषीय सुधारणा – केंद्र व राज्य स्तरावरील आढावा, वित्तीय क्षेत्र सुधारणा – बँकिंग क्षेत्रातील नवीन प्रवाह – खरेखुरे आणि नाममात्र व्याजदर – रेपो आणि प्रतिकूल रेपो व्यवहार. | १५७ |
| २.३ | **वाढ, विकास व आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र :**<br>**(१) विकास निदर्शक :** सातत्यपूर्ण विकास, विकास व पर्यावरण, हरित स्थूल, देशांतर्गत उत्पन्न.<br>**(२) आर्थिक विकासाचे घटक :** नैसर्गिक साधनसंपत्ती, लोकसंख्या, मानवी भांडवल, पायाभूत सुविधा – लोकसंख्याशास्त्रीय संक्रमणाचा सिद्धांत–मानवी विकास निर्देशांक – मानवी दारिद्र्य निर्देशांक – लिंग सक्षमीकरण उपाययोजना.<br>(३) वाढीमधील विदेशी भांडवलाची आणि तंत्रज्ञानाची भूमिका, बहुराष्ट्रीय महामंडळे.<br>(४) वाढीचे इंजिन म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापार – आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत.<br>(५) आयएमएफ–आयबीआरडी–डब्ल्युटीओ – प्रादेशिक व्यापार करारनामा–सार्क–एएसईएएन | १८४ |

| | |
|---|---|
| **२.४ भारतीय कृषिव्यवस्था, ग्राम विकास व सहकार :**<br>(१) आर्थिक विकासातील कृषिक्षेत्राची भूमिका – कृषी, उद्योग व सेवाक्षेत्रे यांच्यामधील आंतरसंबंध – कंत्राटी शेती – ठराविक शेती – औद्योगिक शेती – सेंद्रिय शेती.<br>(२) धारण केलेल्या जमिनीचा आकार आणि उत्पादकता – हरित क्रांती व तंत्रशास्त्रविषयक बदल कृषिविषयक किमती आणि व्यापाराच्या अटी – शेतीला अर्थसाहाय्य – सार्वजनिक वितरण व्यवस्था – अन्नसुरक्षा.<br>(३) भारतातील कृषी उत्पन्न वाढीतील प्रादेशिक तफावत – कृषिविषयक धंदा व जागतिक बाजारपेठ – भारतातील कृषिविषयक पतवारी.<br>(४) बपाटबंधाऱ्याची साधने व जल व्यवस्थापन – पशुधन संपत्ती व त्यांची उत्पादकता, भारतातील आणि महाराष्ट्रातील धवल क्रांती, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, वनीकरण, फलोत्पादन व पुष्पसंवर्धन विकास<br>(५) योजना कालावधीमधील ग्रामीण विकासाची धोरणे – ग्रामीण पायाभूत सोयी (सामाजिक व आर्थिक)<br>(६) जागतिक व्यापार संघटना व शेती – शेतकऱ्यांचे व पैदासकारांचे हक्क – जैवविविधता – जीएम तंत्रज्ञान, कृषी बाजारपेठेतील गॅट (जागतिक व्यापार संघटना) चा अपेक्षित भार.<br>(७) शेतीसाठी लागणारे साहित्य व उत्पादन यांचे विपणन व मूल्यांकन, किमतीतील चढउतार आणि त्यांच्या किमती, कृषी अर्थव्यवस्थेतील सहकारी संस्थांची भूमिका. | २१८ |
| **२.५ कृषी :**<br>**(१) राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत कृषिचे महत्त्व** : कमी उत्पादकतेची कारणे आणि कृषिविषयक उत्पादन व जमीन सुधारणा व जमिनीचा वापर ; मृदा व जल संधारणा, पर्जन्याश्रयी शेती यांसारख्या विकासकामांकरिता सिंचन आणि त्याच्या पद्धती शेतीचे यांत्रिकीकरण, आयसीएआर, एमसीएईआर यांची भूमिका.<br>**(२) ग्रामीण कर्जबाजारीपणा, कृषी पतवारीची समस्या** : गरज, महत्त्व व त्यात गुंतलेल्या वित्तीय संस्था, नाबार्ड व भूविकास बँक – कृषी किमती – घटक, विविध कृषी उत्पादनांवर परिणाम करणारे घटक – विविध कृषी विषयक उत्पादने यांच्या शासकीय आधारभूत किमती, अर्थसाहाय्य, कृषी पणन – सद्य:स्थिती, मूल्यवर्धित उत्पादने, शासनाची भूमिका आणि कृषी पणनातील त्यांच्या संस्था (एपीसी, एपीएससी,इ.). | २४७ |
| **२.६ अन्न व पोषणआहार** : भारतातील अन्न उत्पादन व खप यामधील कल पहिली व (नंतर) घडणारी दुसरी हरित क्रांती, अन्न स्वावलंबन, अन्न सुरक्षिततेमधील समस्या, साठवणुकीतील समस्या व प्रश्न, प्राषण, वितरण, अन्नाची आयात व निर्यात, अन्नाचे कॅलरी मूल्य, व त्याची मोजणी, चांगले आरोग्य व समतोल आहारासाठी मानवी शरीरास आवश्यक असलेली ऊर्जा व पोषण मूल्य भारतातील नेहमीच्या पोषणविषयक समस्या आणि त्याची कारणे व परिणाम, शासनाची धोरणे, योजना व पीडीएस यासारखे कार्यक्रम, कामासाठी अन्न, दुपारचे भोजन योजना व इतर पोषणविषयक कार्यक्रम, प्रस्तावित अन्न सुरक्षा अधिनियम. | २७७ |
| **२.७ भारतीय उद्योग पायाभूत सुविधा व क्षेत्र:**<br>(१) कल, उद्योगाची रचना व वाढ, भारतातील सुविधा व क्षेत्र – लोकांची भूमिका, भारतातील खासगी व सहकारी क्षेत्र – लघु उद्योग व कुटीर उद्योग, बीपीओ.<br>(२) भारतीय उद्योगधंद्यामधील उदारमतवाद आणि त्याचे परिणाम – उद्योगातील आजारीपण. | ४० |

| | ३. विज्ञान व तंत्रज्ञान विकास | |
|---|---|---|
| ३.१ | **ऊर्जा** : पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा साधने – सौर, वारा, जैव वायू, जीववस्तुमान, भूऔष्णिक व इतर नवीकरणयोग्य ऊर्जा साधनांची संभाव्यता, सौर साधने म्हणजेच सौर कुकर, पाणी तापक इ. नव्याने सुरुवात जैववायू (बायोगॅस) तत्त्वे व प्रक्रिया, ऊर्जा संकटाची समस्या, शासकीय धोरणे आणि वीज निर्मितीसाठी कार्यक्रम, अणूशक्ती कार्यक्रम, औष्णिक वीज कार्यक्रम, जलविद्युत कार्यक्रम, वीज वितरण व राष्ट्रीय विद्युत पुरवठा, ऊर्जा सुरक्षा, संशोधन व विकास यात गुंतलेली अभिकरणे व संस्था. | २८९ |
| ३.२ | **संगणक व माहिती तंत्रज्ञान** : आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका आणि माहितीची देवाण–घेवाण, नेटवर्किंग व वेबतंत्रज्ञान यांसारख्या जीवनाच्या विविध क्षेत्रामधील त्याचे उपयोजन, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, विविध सेवांमधील माहिती तंत्रज्ञानाचा वापर, मीडिया लॅब आशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, कम्युनिटी माहिती केंद्र इ. सारखे शासकीय कार्यक्रम, माहिती तंत्रज्ञान उद्योगातील महत्त्वाचे प्रश्न – त्याचे भवितव्य. | ३०२ |
| ३.३ | **अवकाश तंत्रज्ञान** : भारतीय अवकाश कार्यक्रम, दूरसंचार, दूरदर्शन, शिक्षण, प्रसारण, हवामान अंदाज, जी.पी.एस, आपत्ती इशारा याकरिता भारतीय कृत्रिम उपग्रह, भारतीय क्षेपणास्त्र कार्यक्रम इ. सुदूर संवेदना, भौगोलिक माहिती यंत्रणा (जीआयएस) आणि हवामान अंदाज, आपत्ती इशारा यामधील तिचे उपयोजन, जल, मृदा, खनिज संपत्ती विकास, कृषी व मत्स्यविकास, नागरी नियोजन, परिस्थितीकी अभ्यासक्रम, भौगोलिक यंत्रणा व भौगोलिक माहिती यंत्रणा. | ३१३ |
| ३.४ | **जैव तंत्रज्ञान** : कृषी औद्यागिक विकास व रोजगार निर्मितीद्वारे मानवी जीवन व राष्ट्रीय अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी संभाव्य शक्यता, नैसर्गिक साधनसंपत्ती विकासाचे आवश्यक व महत्त्वाचे साधन म्हणून जैवतंत्रज्ञान उपयोजनाची क्षेत्रे – कृषी, पशु पैदास व पशुवैद्यकीय आरोग्य केंद्र, औषधनिर्माण विद्या मानवी आरोग्य केंद्र, अन्न तंत्रज्ञान, ऊर्जा निर्मिती, पर्यावरण संरक्षण इ., देशातील जैवतंत्रज्ञानाबाबत प्रचालन, नियमन व विकास यांमधील शासनाची भूमिका व प्रयत्न, जैवतंत्रज्ञानाच्या विकासाशी संबंधित नैतिक, सामाजिक व कायदेशीर प्रश्न, जैवतंत्रज्ञान विकासाचे शक्य ते प्रतिकूल परिणाम, बियाणे तंत्रज्ञान, त्याचे महत्त्व, बियाणांची गुणवत्ता, बियाणांचे विविध प्रकार आणि त्यांचे बियाणे उत्पादन व प्रक्रिया तंत्रे, बी. टी. कापूस, बी. टी. वांगे इ. | ३२९ |
| ३.५ | **भारताचे आण्विक धोरण** : ठळक वैशिष्ट्ये, ऊर्जेचा स्त्रोत म्हणून अणूऊर्जा आणि स्वच्छ ऊर्जा म्हणून त्याचे महत्त्व, आण्विक टाकाऊ कचऱ्यांच्या समस्या, भारतातील औष्णिक वीज निर्मिती, एकूण वीज निर्मितीमधील त्याचे अंशदान, आण्विक चाचणी निर्धारके; पोखरण एक (१९७४) आणि पोखरण दोन (१९९८) न्यूक्लिअर नॉन – प्रोलिफरेशन ट्रिएटी आणि कॉंप्रेहेन्सिव टेस्ट बॅन ट्रिएटी यासांरख्या आण्विक धोरणाबाबतचा अलीकडला कल, २००९ चा इंडो – युएस न्यूक्लिअर करार. | ३५७ |
| ३.६ | **आपत्ती व्यवस्थापन** : आपत्तीची व्याख्या, स्वरूप, प्रकार व वर्गीकरण, नैसर्गिक धोके, कारणीभूत घटक व ते सौम्य करणारी उपाययोजना, पूर, भूकंप, त्सुनामी, दरड कोसळणे इ. सौम्य करणाऱ्या उपाययोजनांवर परिणाम करणारे घटक, किल्लारी (१९९३), भूज (२००१), सिक्कीम – नेपाळ,(२०११) भूकंप तसेच बंदा आले (२००४) (सुमात्रा) फुकुशिमा (२०११) (जपान) भूकंप व त्सुनामी यांसारख्या मोठ्या भूकंप व त्सुनामी प्रकरणांचा अभ्यास, महाराष्ट्र २००५ चा मुंबईतील पूर, डिसेंबर १९९३, जून २००६, नोव्हेंबर २००९, जुलै २०११ चे बॉंबस्फोट आणि अतिरेक्यांचा हल्ला त्यांचा परिणाम. | ३७० |

# विश्लेषण तक्ता

## विचारलेल्या प्रश्नांची संख्या

| अभ्यासक्रम | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. अर्थव्यवस्था व नियोजन | | | | | | | |
| १.१ | ३ | ८ | ५ | २ | ६ | २ | २ |
| १.२ | ११ | ११ | २ | ६ | १० | ४ | ३ |
| १.३+२.७ | ६ | ७ | ४ | १४ | ८ | ८ | ९ |
| १.४ | ५ | १ | ३ | ३ | ५ | ७ | ५ |
| १.५ | ७ | ५ | ५ | ५ | ७ | ७ | ७ |
| १.६ | ६ | ९ | १० | १० | ४ | १२ | ६ |
| १.७ | ६ | ३ | ५ | ६ | ५ | ४ | ३ |
| १.८ | २ | २ | ५ | ४ | ७ | ६ | ५ |
| १.९ | १ | २ | ४ | ४ | ३ | ३ | ९ |
| २. विकास व कृषी अर्थशास्त्र | | | | | | | |
| २.१ | १२ | ७ | १० | ४ | ४ | ५ | ३ |
| २.२ | ५ | १० | १३ | ८ | १३ | १६ | १४ |
| २.३ | १६ | १३ | १३ | १५ | १० | १० | ११ |
| २.४ | १२ | ९ | ११ | १२ | ११ | १५ | ९ |
| २.५ | ९ | १३ | १४ | १२ | ११ | ८ | १७ |
| २.६ | ८ | ६ | ६ | ७ | ५ | ३ | ६ |
| ३. विज्ञान व तंत्रज्ञान विकास | | | | | | | |
| ३.१ | २ | ९ | ५ | ७ | ७ | ३ | ६ |
| ३.२ | ५ | ४ | ४ | ५ | ४ | ५ | ५ |
| ३.३ | ७ | ६ | ५ | ५ | ५ | ६ | ४ |
| ३.४ | १५ | १५ | १३ | १० | १६ | १५ | १५ |
| ३.५ | ६ | २ | ७ | ६ | ३ | ६ | ५ |
| ३.६ | ५ | ७ | ६ | ५ | ५ | ५ | ५ |

# सामान्य अध्ययन– ४

# १. अर्थव्यवस्था व नियोजन

**: अभ्यासक्रम :**

**१.१ भारतीय अर्थव्यवस्था** : भारतीय अर्थव्यवस्थेमधील आव्हाने : गरिबी, बेरोजगारी व प्रादेशिक असमतोल, नियोजन : प्रक्रिया प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनांचा आढावा, मूल्यमापन, विकासाचे सामाजिक व आर्थिक निदर्शक, राज्य व स्थानिक स्तरावरील नियोजन, विकेंद्रीकरण – संविधानातील ७३ वी व ७४ वी सूधारणा.

## २०१२

**२६. भारताच्या दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये खालील लक्ष्य निश्चित केलेले नव्हते :**

१) दारिद्र्यात घट
२) सहकारास प्रोत्साहन
३) वृद्धिदर व रोजगार वाढ
४) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

**उत्तर : २ – सहकारास प्रोत्साहन**

**स्पष्टीकरण –** दहावी पंचवार्षिक योजना २००२–०७ कालावधी – १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००७

– दहाव्या योजनेची लक्ष्ये –१) च्या वाढीच्या दराचे लक्ष्य – प्रतिवर्ष आठ टक्के

२) दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण २००७ पर्यंत २१% तर २०१२ पर्यंत ११% पर्यंत कमी करणे.

३) २००१ ते २०११ या दशकातील लोकसंख्या वाढीचा दर १६.२% पर्यंत कमी करणे.

४) साक्षरतेचे प्रमाण २००७ पर्यंत ७५% पर्यंत तर २०१२ पर्यंत ८०% पर्यंत वाढविणे.

५) बालमृत्यू प्रमाण २००७ पर्यंत दर हजारी ४५ पर्यंत तर २०१२ पर्यंत दर हजारी २८ पर्यंत कमी करणे.

६) मातामृत्यू प्रमाण २००७ पर्यंत दर हजारी जीवंत जन्मांमागे २ तर २०१२ पर्यंत दर हजारी जीवंत जन्मांमागे १ पर्यंत कमी करणे.

७) जंगल व्याप्त प्रदेशाचे प्रमाण २००७ पर्यंत २५% तर २०१२ पर्यंत ३३% पर्यंत वाढविणे.

८) २००३ पर्यंत सर्व मुले शाळेत हजर तर २००७ पर्यंत सर्व मुलांनी ५ वर्षांचा शालेय अभ्यासक्रम पूर्ण करावा, हे साध्य करणे.

९) २०१२ पर्यंत सर्व खेड्यांना शाश्वत स्वच्छ पेयजल पुरवठा.

१०) २००७ पर्यंत सर्व मोठ्या प्रदूषित नद्यांची स्वच्छता.

**३४. अकराव्या पंचवार्षिक योजनेत दारिद्र्यरेषेखालील व्यक्तिंचे प्रमाण कमी करण्याबाबत निश्चित करण्यात आलेले उद्दिष्ट होते:**

१) दरवर्षी १टक्क्याप्रमाणे पंचवार्षिक योजनेच्या काळात ५%
२) दरवर्षी २ टक्क्यांप्रमाणे पंचवार्षिक योजनेच्या काळात १०%
३) पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षाच्या काळात प्रत्येक १%, नंतरच्या ३ वर्षाच्या काळात २ % या प्रमाणे एकूण १०%
४) वरीलपैकी कोणतेही नाही.

**उत्तरः २ – दरवर्षी २ टक्क्यांप्रमाणे पंचवार्षिक योजनेच्या काळात ५%**

**स्पष्टीकरण – ११ व्या योजनेची दृष्टी (Vision of the 11th Plan)**

११ व्या योजनेच्या व्यापक दृष्टीकोनामध्ये अनेक परस्परसंबंधित घटकांचा समावेश करण्यात आला –

१. वेगवान वृद्धी, ज्यामुळे दारिद्र्य कमी होऊन रोजगाराच्या संधींची निर्मिती होईल.

२. आरोग्य व शिक्षणासारख्या अत्यावश्यक सेवांची उपलब्धता, विशेषतः गरिबांसाठी.

३. शिक्षण व कौशल्य विकासाच्या माध्यमातून सबलीकरण.

४. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून रोजगारांच्या संधींचा विस्तार.

५. पर्यावरणीय शाश्वतता.

६. लिंगविषयक असमानतेत घट.

७. शासनप्रणालीमध्ये सुधारणा इ.

– रोजगार निर्मिती व दारिद्र्य निर्मूलन

१) १० व्या योजनेदरम्यान ४.७ कोटी रोजगाराच्या नव्या संधी (लक्ष्य ५ कोटींचे होते.) निर्माण करण्यात आल्या. ११ व्या योजनेदरम्यान ५.८ कोटी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. त्यापैकी २.४ उद्योग क्षेत्रात जर ३.४ सेवा क्षेत्रात निर्माण केल्या जातील.

२) ११ व्या योजनेत दारिद्र्याचे प्रमाण १० टक्क्यांनी कमी करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले.

**६५. भारताच्या सन २००० च्या लोकसंख्याविषयक धोरणाचे दीर्घकालीन उद्दिष्ट काय आहे ?**

१) सन २०२० पर्यंत किमान जन्मदर साध्य करणे.
२) सन २०३० पर्यंत सुदृढ लोकसंख्या साध्य करणे.
३) सन २०४० स्त्री–पुरुष प्रमाणात वाढ करणे.
४) सन २०४५ पर्यंत स्थिर लोकसंख्या साध्य करणे.

**उत्तरः ४ – सन २०४५ पर्यंत स्थिर लोकसंख्या सध्या करणे.**

**स्पष्टीकरण – राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २००० (National Population Policy)**

१) १९९१ मधील जनगणनेची आकडेवारी बाहेर आल्यानंतर त्यावर उपाय म्हणून १९९२ मध्ये श्री. करुणाकरन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने नवीन लोकसंख्या धोरण जाहीर करण्याची शिफारस केली. शासनाने फक्त धोरणात्मक घोषणा न करता तिच्या अंमलबजावणीसाठी धोरणात्मक कार्यक्रम राबविण्याचा सल्ला या समितीने दिला.

२) ११९३ मध्ये वरील सूचनेनुसार डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ दल स्थापन करण्यात आले. या तज्ज्ञ दलाने नवीन धोरणाचा मसुदा तयार केला. हा मसुदा संसदेत संमत झाला आणि १५ फेब्रुवारी २००० ला (दुसरे) राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहीर करण्यात आले. याचकाळात १९९७ मध्ये आंध्र प्रदेश, १९९९ मध्ये राजस्थान, २००० मध्ये मध्यप्रदेश यांनी त्या–त्या राज्यांमध्ये राज्य लोकसंख्या धोरणही जाहीर केले.

३) धोरणाची उद्दिष्टे (Objectives)

a) २००० मधील लोकसंख्या धोरणाचे तातडीचे (Immediate) उद्दिष्ट संतती नियमन, आरोग्य पायाभूत सुविधा व आरोग्य सेवकांची गरज भागविणे आणि प्रजनन व बालआरोग्य सेवा मिळविण्यासाठी एकात्मिक सेवा पुरविणे हे होते.

b) या धोरणांचे मध्यावधी (Medium term) उद्दिष्ट २०१० पर्यंत एकूण जननदर पुनःस्थापनेच्या स्तरावर आणणे व यासाठी धोरणात्मक अंमलबजावणी करणे हे होते. जननदर (Total fertility rate) पुनःस्थापनेच्या स्तरावर (Replacement Level) आणणे म्हणजे जननदर २.१ वर आणणे. म्हणजे एका जोडप्यामागे दोन मुले (हम दो, हमारे दो) या तत्त्वाचा प्रसार करणे व तशी अवस्था २०१० पर्यंत प्राप्त करणे.

c) या धोरणाचे दीर्घकालीन उद्दिष्ट (Long term)२०४५ पर्यंत लोकसंख्या स्थिरीकरण करणे व ती अशा स्तरावर स्थिर करणे, जिथे शाश्वत आर्थिक वाढ व सामाजिक विकास होईल आणि पर्यावरण सुरक्षित राहील.

## २०१३

२३. **काही पंचवार्षिक योजनांकरिता विकासाच्या उद्दिष्टांची टक्केवारी व प्रत्यक्षात आत्मसात विकासात टक्केवारी पुढे दिली आहे. यातील कोणते विधान चुकीचे आहे?**

| | **उद्दिष्ट** | **प्रत्यक्षात** |
|---|---|---|
| १) प्रथम योजना (१९५१ – ५६) | २.१ | ३.६ |
| २) चौथा योजना (१९६९ – ७४) | ५.७ | २.०५ |
| ३) आठवी योजना (१९९२ – २००७) | ५.६ | ६.६८ |
| ४) दहावी योजना (२००२ – २००७) | ८.० | ९.७ |
| **उत्तर:४ – दहावी योजना (२००२– २००७)** | **८.०** | **९.७** |

**स्पष्टीकरण –**

| योजना | कालावधी | मुख्य भर | प्रतिमान | आर्थिक वृद्धी दर | | सार्व. क्षेत्रापैकी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संकल्पित | साध्य | सर्वाधिक खर्च |
| I | १९५१–५६ | कृषी | हेरॉड–डोमर | २.१ | ३.६ | कृषी व जलसिंचन |
| II | १९५६–६१ | जड व मूलभूत उद्योग | महालनोबिस | ४.५ | ४.२१ | वाहतूक व दळणवळण |
| III | १९६१–६६ | कृषी व जड उद्योग | महालनोबिस/ एस.चक्रवर्ती | ५.६ | २.७२ | वाहतूक व दळणवळण |
| वार्षिक योजना | १९६६–६९ | स्वावलंबन | –५.० | ३.९ | – | |
| IV | १९६९–७४ | स्वावलंबन/ स्थैर्यासह वाढ | ॲलन मान व रूद्र धनंजयराव गाडगीळ | ५.७ | २.०५ | कृषी व जलसिंचन |
| VIII | १९९२–९७ | मानवी विकास सूचक नियोजन | राव–मनमोहन/ LPG | ५.६ | ६.८ | ऊर्जा |
| IX | १९९७–०२ | कृषी व ग्रामीण विकास | – | ६.५ | ५.५५ | ऊर्जा |
| X | २००२–०७ | शिक्षण | – | ८.० | ७.८ | सामाजिक सेवा |

४५. **१२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये (२०१२–१७), नियोजन आयोगाने पायाभूत विकासाठी अंदाजे रु. ४५ लक्ष कोटींची गुंतवणुकीची तरतूद केली आहे. या गुंतवणुकीपैकी खासगी गुंतवणुकीचा वाटा किती आहे?**

१) कमीतकमी ५०% २) ६०% ३) कमीतकमी ४५% ४) ७५%

**उत्तर : १ – कमीतकमी ५०%**

**स्पष्टीकरण – १२ व्या योजनेची क्षेत्रिय लक्ष्ये (Sectoral Targets)**

– १२ व्या योजनेच्या अखेर साध्य करावयाची लक्ष्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. दारिद्र्याचे प्रमाण १० टक्क्यांनी कमी करणे.

२. गैर–कृषी क्षेत्रात ५० दशलक्ष नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करणे, तसेच तेवढ्याच व्यक्तींना कौशल्य प्रमाणपत्र उपलब्ध करून देणे.

३. सरासरी शालेय वर्षे ७ वर्षांपर्यंत वाढविणे.

४. शालेय पटनोंदणीमधील लिंग व सामाजिक तफावत दूर करणे.

५. १००० जिवंत जन्मांमागे अर्भक मृत्युदर (IMR) २५ पर्यंत आणि माता मृत्युदर १ टक्क्यांपर्यंत कमी करणे. बाल लिंग गुणोत्तर ९५० पर्यंत वाढविणे.

६. एकूण जननदर २.१ पर्यंत कमी करणे.